NO1998121701

विशेष मागास प्रवर्गातून हलबा ही जात वगळल्याबाबत.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: सीबीसी-१०९८/प्र.क्र.२५६/मावक-५.
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १७ डिसेंबर, १९९८.

परिपत्रक

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक: सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक १३ जून, १९९५ अन्वये विशिष्ट जातींचा विशेष मागास प्रवर्गामध्ये समावेश केला आहे. त्यामध्ये हलबा जातीचाही समावेश होता. तद्नंतर शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्रमांक सीबीसी-१४९४/प्र.क्र.२३६/मावक-५, दिनांक १८ नोव्हेंबर, १९९५ अन्वये "हलबा जात" ही जात विशेष मागास प्रवर्गातून वगळण्यात आली आहे, असे असतानाही वैद्यकीय शिक्षण व शालेय शिक्षण विभागाकडून "हलबा जात" ह्या जातीच्या लोकांकडून विशेष मागास प्रवर्गाच्या जातीच्या प्रमाणपत्राची मागणी केली जाते. हलबा व हलबी जात अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये अनुक्रमांक-१९ वर समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे त्या जमातीच्या लोकांना अनुसूचित जमातीसाठी देय असलेले फायदे मिळण्यास ते पात्र आहेत. "हलबा जात" ही जात विशेष मागास प्रवर्गातून वगळण्यात आली असल्यामुळे त्या जातीच्या लोकांना विशेष मागास प्रवर्गाची प्रमाणपत्रे देता येणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
[ ज. स. घाणेकर ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
सचिव सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,